Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

# कॉम्रेड नाना मालुसरे यांचे कामगार व शेतकरी चळवळीतील योगदान

श्री. जी. डी. रुपवते,
प्राध्यापक,
कला महाविद्यालय, अभोणा,
ता. कळवण, जि. नाशिक

कॉम्रेड नरेंद्र उर्फ नानासाहेब मालुसरे यांचा जन्म १२ जानेवारी १९२७ रोजी एका श्रीमंत व केवळ सुशिक्षित नव्हे तर सुसंस्कारीत घरात झालात्र नानांचे वडील स्टेशन मास्तर होते. पुढे नाशिकहून बदली झाल्यानंतर वडिलांनी सेवानिवृत्ती घेतली आणि पटेल कॉलनी नाशिक येथील जागेत वास्तू उभारीली. या वास्तूचे नांव ''सरस्वती सदन'' ही सरस्वती म्हणजे नानांची आई. सारेजण तिला माई म्हणत. माईने लावलेले फणसाच्या झाडासारखे गुणधर्म नानांनी उचलेलेत्र

कॉम्रेड नाना मालुसरे यांच्या कार्याची माहिती पुढे यावी, नानांनी जो लढा दिला तो मानवमुक्तीचा लढा होता. तो कोणत्याही जाती, धर्म, किंवा पंथाचा लढा नव्हता. भांडवलाच्या कचाट्यातून समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांनी केलात्र कामगार, कष्टकरी, शेतकरी यांचया हक्काची त्यांनी जागृती केली.

काही व्यक्तींचे सिध्दांत, धोरणे व शिस्त याबाबतीत एकसंघपणा असला तरी माणसा—माणसागणिक स्वभाव वेगवेगळे असतातत्र कोणी अबोल तर कोणी बोलघेवडे, कोणी गंभीर प्रवृत्तीचे तर कोणी खेळकर, कोणी पुस्तकार रमणारे तर कोणी माणसांच्या सहवासात खुलणारेत्र कॉ. नानांना एक साच्यात बसविणे अवघड म्हणण्यापेक्षा जवळजवळ अशक्य होतेत्र नाना पक्षाच्या सभेमध्ये कमी बोलत, परंतु प्रवासात कार्यकत्यांच्या सोबत असले तर त्यांचया गप्पा गोष्टींमध्ये वेळ कसा जायचा हे समजत नव्हते. कसाऱ्याच्या घाटात टोपीची विहीर आहे. येथे आल्यावर नानांची आठवण होतेत्र नाना आपल्या असंख्य कार्यकर्त्यांना तास — दीड तास या विहिरीच्या गोष्टी सांगत असत. नानांचे स्वभावदर्शन वेगळेच होते. नाना आपल्या मतांबद्दल ठाम असत. परंतु काही चुकले तर चूक मान्य करायला ते सहज तयार होत असत.

कम्युनिस्ट पक्षात नानांना महत्वाचे स्थान होते. नानांच्या मते कम्युनिस्ट पक्षामध्ये माणसे येतात ती भिन्न भिन्न अनुभवातून. भारतातील निरनिराळ्या राज्यामधील पक्षशाखांची घडणदेखील वेगवेगळ्या वर्गाच्या चळवळीतून झालेली दिसे. तसेच मुंबई, महाराष्ट्रातील पक्षाचा उगम आणि विकास लढाऊ कामगार चळवळीतून होत गेला. त्यातून त्या राज्यशाखेला लढाऊवर्गीय बाणा तयार झाला असला तरी मागास वसाहती देशाच्या चळवळीच्या दृष्टीने त्यात काही महत्वाची वैगुण्ये राहून गेली. लोकशाही क्रांतीमध्ये

कामगार वर्गाचा निकटचा दोस्त असलेल्या राबणाऱ्या शेतकरी वर्गाला संघटित करण्याचे कार्य अपुरेच राहिले असे नानांचे विचार होते.

परंतु आजही किसान सभेची लक्षणीय अशी वाढ ठाणे आणि नाशिक जिल्हयाच्या आदिवासी भागातच झालेली आहे आणि नाशिकमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला निवडणुकीत यश मिळते तेही याच भागात. या दोहोंचे श्रेय प्रथमत: गोंदुताई आणि शामराव परळेकर यांना आहे. तसेच गोदुताईच्या सोबत नरेंद्र उर्फ नाना मालुसरे हे नाव घ्यावे लागते.

नाना अनेकांप्रमाणे। कामगार चळवळीतून पक्षाकडे आले नव्हते. सुरुवातीला ते स्वातंत्र लढयाकडे ओढले गेले. गांधीवादी त्याच्या लढाउ आणि। चिकित्सक वृतीचे समाधान करणे शक्य नव्हते. १९४२ च्या लढयातील जहाल प्रवाहात म्हणजे ते समाजवादयामध्ये सामील झाले. नंतर समाजवादी गटाबरोबर ते कम्युनिस्ट पक्षात सामील झाले.

कम्युनिस्ट पक्षात त्यावेळी वैचारिक मंथन जोरात चालू होते. या दरम्यान भारतीय राज्यसत्तेच्या वर्गस्वरपाबदल आणि त्यात बदल आखण्याच्या डावपेचाबददल मतभेद होते. केरळचे पहिले कम्युनिस्ट सरकार पंडीत नेहरनी बरखास्त केल्यानंतर ते अधिक तीव्र झाले. परंतु साठच्या दशकात मात्र मार्क्सवादी कार्यकत्यांना व नानांना तुरुंगात डांबण्यात आले होते. त्याना सरकारने देशद्रोही ठरविले. अशा कसोटीच्या प्रसंगी डाव्या समाजवादी गटातून कम्युनिस्ट पक्षात आलेले नानांचे कित्येक नामवंत सहाकरी गडबडले आणि डांगे प्रवाहात सामील झाले.

परंतु नानानी अविचल निष्ठेने मार्क्सवादाचा झेंडा फडकत ठेवला आणि आपले स्थान पक्षाच्या राज्य कमिटीवर घेतले आणि त्याप्रमाणे। पुढील वाटचाल केली.

कॉ. नरेंद्र मालुसरे हे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून वर्गीय राजकारणामुळे आले आणि नाशिक जिल्हयातील सर्वात उपेक्षित, वंचित व शोषित अशा आदिवासी समाजात जागुती केली. त्याचवेळी दलित मुक्तीच्या चळवळीशीही ते संबंध ठेवून होते आणि दादासाहेब गायकवाड, शांताबाई दाणी या डॉ. आंबेडकरांच्या अग्रगण्य सहकाराशी त्यांचे मैत्रिचे संबंध होते.

कॉ. नानांनी आपल्या अनुभवाला आणि जाणिवांना वैचारिक रुप दिले असते तर महाराष्ट्रातील कम्युनिस्ट चळवळी मोठ्या प्रमाणात पुढे गेली असती. परंतु नानांचे काम कमी महत्वाचे असे मानणे चुकीचे ठरेल.

कॉ. नाना मालुसरे नावाचा एक व्यक्ती, एक उत्तम खेळाडू राजकीय मैदानात उतरला आणि नाशिककर एक उत्तम खेळाडूस मुकले. ते क्रिकेट अतिशय उत्तम खेळत असत. मात्र असे असले तरी

त्यांना आपल्या खिलाडू वृत्तीपासून दूर जावे लागले. तत महाराष्ट्रातील व नाशिकमधील कामगार, कष्टकरी, शेतकरी वर्गाला वाली मिळाला. नाना एक ध्येयवादी, धडाडीचा, परखडपणे बोलणारा पण दिलदार अंत:करणाचे राजकीय नेते होते.

नानांचा जन्मच एका श्रीमंत व सुसंस्कारीत घरात झाला असे असूनही नाना अत्यंत खोडकर, मिश्किल, विनोदी होते त्यांना शिकारीची आवड होती. कोणत्याही कामाबद्दल त्यांना संकोच वाटत नसे. ते घरातील कामांतही मदत करीत. नानांच्या वडिलांच्या निधनानंतर सर्व जबाबदारी माईनी व नानांनी पूर्णपणे पार पाडली. मालुसरे हे त्याकाळचे श्रीमंत म्हणून गणले गेलेले कुटुंब होते. तरीसुध्दा माईनी म्हणजे या घराण्याने माणुसकी हा र्ध कधी सोडला नाही. शालिनता आणि सुसंस्कार असणारे नानांचे आईवडिल होते. त्याकाळी सुशिक्षित पालकवर्ग नव्हता. परंतु वडिलधारी माणसांच्या वागण्याबोलण्याचे परिणाम व संस्कार आपल्या मुलाबाळांवर आपोआप होत असत.

कोणताही पोटपाण्याचा उद्योग न स्वीकारता उत्तम क्रिकेटपटू होउ शकणारा आपला मुलगा, त्यामार्गे मिळणारा पैसा व कीर्ति याकडे पाठ फिरवून राजकारणात शिरु पाहतोय हे माईंनी मान्य केले आणि योग्य निर्णय घेऊन त्यांनी नानांची भविष्यकालीन वाटचाल मोकळी केली.

नानांनी कामगार, आदिवासी शेतकरी यांच्या उन्नतीसाठी कार्य करण्यास सुरुवात केली. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी ते अहोरात्र झिजले. हे कार्य करीत असताना 'जेल' तर नानांच्या पाचवीलाच पुजलेले होते. या दरम्यान पत्नी अनुराधाताईंना समाजाने त्रास दिला. ताईना नानांच्या कामात प्रत्यक्ष मदत करता आली नसली तर अप्रत्यक्षपणे त्यांनी नानांना प्रचंड भावनिक, आर्थिक पाठबळ दिले. नाना प्रकारच्या खस्ता खाउन नानांचा खडतर मार्ग त्यांनी कितीतरी सुसह्य केला.

तसेच नानांच्या या खऱ्या खुऱ्या सहचारिणीने समजूतदारपणे कमालीचा सोशिकपणा दाखवून परस्परात कोणतीही कटुता येड दिली नाही. वकेवळ शब्दिक अर्थने अर्धांगिनी नव्हे तर ध्येयवादी जीवनाची खरीखुरी साथीदारीण नानांना लाभली. पण याचबरोबर नानांचे भग्य याहुनही थोर होते. पंतसारखा ॲड. दत्ताजी जायभावे सारखा मित्रही त्यांना लाभला.

नाना हा गमत्या व स्वच्छंद मुलगा होता. तो भविष्यात निधड्या छातीने एखादे असामान्य साहसीकृत्य करेल आणि पुढील आयुष्यात शास्त्रीय राजकारणाचे शस्त्र हाती घेउन एका समर्पित कार्यकत्यांचे जीवन जगेल असं त्यावेळी कोणलाही वाटले नाही, हे एक आश्चर्यच होते. राजकारणाचा व समाजपयोगी कामात मग्न असताना याच दरम्यान दुसरे महायुध्द सुरु झाले होते. दोन वर्ष होउनही ब्रिटिश शासन हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या विचारात नव्हते. ब्रिटिशांच्या संकटकाळात हिंदी सेनेने व सर्व सामान्य लोकांनी त्यांना

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue – IV December 2014

मदतच केली. परंतु हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य युध्दात कॉंग्रेसचे वर्चस्व होते. त्याचे मवाळवादी धोरण होते. या दरम्यान म्हणजे महात्मा गांधींनी ८ ऑगस्ट ला 'चले जाव' ही घोषणा केली व एकच तेजाचे वारे वाहू लागले. पण त्याच रात्री साम्राज्यवाद्यांनी स्वातंत्र सैनिकांना तुरुंगात डांबले.

नानासारख्या काही प्रमाणात जहालवादी विचारसरणीला हे सहन होणे कठिण होते. या लढाऊ तरुणांनी ९ ऑगस्ट ग्रुपची स्थापना केली. याच गटाने ४२ चे आंदोलन आपल्या कुवतीनुसार तेवत ठेवले आणि मुख्य लढ्याची वाटचाल सुरु केली. तेव्हा या लढयाच्या पुढील लाटेची पूर्व तयारी म्हणून शेतकरी, कामगार, कष्टकऱ्यांना वर्गीय पायावर उभे करण्यासाठी त्यांच्या वर्गीय संघटना, युनियन्स व शेतकरी संघ इत्यादीच्या उभारणीस त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. याच प्रेरणेतून सन १९४५–१९४८ च्या काळात नानांनी अनेकानेक कामगार संघटना उभ्या केल्या. रेल्वे कामगारांची संधटना करण्याकरीता नांदगांव, मनमाड व इगतपुरी या भागांमध्ये नानांनी सभा घेउन जनजागृती केली.

भगूर मोटार कामगार युनियन, विडी कामगार युनियन, देवळाली इलेक्ट्रीक सप्लाय कामगार युनियन व सिक्युरिटी प्रिंटींग याच बरोबर आदिवासी शेतकऱ्यांचा निळवंडी पाडा लढा उभारला. अर्थात एका बाजुला असे वर्गीय लढे उभारताना भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. म्हणूनच ४६ च्या आरमारी बंडाच्या काळी नाशिक शहरात व जिल्ह्यात प्रचंड निदर्शने करुन नानांनी लढाउ आरमारी सैनिकांच्या पाठिशी नाशिक जिल्ह्यातील जनसामान्यांचा पाठिंबा उभ केला.

नना आणि निळवंडी पाड्याच्या लएयातील नानांचे सहकारी खंडेराव घुटे यांना कारावास भोगावा लागला. १९४८ मध्ये समाजवादी पक्षाची स्थापना नाशिकच्या एच.पी.टी. कॉलेजच्या पटांगणात झाली. त्यावेळी नानांनी रेल्वे कामगार संघटना, नांदगांव म्युनिसिपल कामगार संघटना, सिक्युरिटी प्रिंटींग प्रेस कामगार संघटना, भगूर मोटार ट्रान्सपोर्ट, देवळाली इलेक्ट्रिक सप्लाय व बिडी कामगार युनियन अशा अनेक कामगार संघटना आणि दिंडोरी, पेठचे शतकरी यांची फौज नानांच्या समाजवादी पक्षाच्या स्थापनेच्या अधिवेशानासाठी उभी राहिली आणि नाशिकसारख्या ऐतिहासिक महत्वाच्या शहरात समाजवादी पक्षाचे ऐतिहासिक अधिवेशन संपन्न झाले.

१९४८ साली समाजवादी पक्ष स्थापन करताना भारताच्या कोट्यावधी कष्टकऱ्यांना, कामगारांना, शेतकऱ्यांना व गरीबांना न्याय देणारा, देशाला आर्थिक, सामाजिक समतेकडे नेणारा क्रांतीकारक लोकशाही, समाजवादी पक्ष आपण उभारीत आहोत. अशा उमेदीने नानांनी नव्या दमाने कार्याला प्रारंभ केला. भांडवलशाही, जमीनदारशाही उपजीविका राजनितीला आणि आर्थिक धोरणांना पर्याय ठरणारी शेतकरी कामगार वर्गाचा, जनसामान्यांचा वर्गीय राजकारणाचा झोंडा घेउन जगातील अनेक देशात मूर्त झालेल्या समाजवादी

सांध्याप्रमाणेच भारतातही भांडवलदारी, जमीनदारी शक्तींचा पाडाव करुन जनतेची लोकशाही समाजवादी सत्ता स्थापन करावयाची कल्पना कॉ. नानांची व इतर कार्यकत्यांची होती.

समाजवादी पुढाऱ्यांच्या जाचक वर्चस्वाचे जोखड फेकून देउफन पुढे आलेल्या डाव्या समाजवादी गटाच्या कार्यकत्यांनी ठिठिकाणी कामगार – शेतकऱ्यांचे प्रचंड संघर्ष नानांनी चेतावले. त्यांचे तत्कालीन अग्रणी नेते कॉ. माधवराव गायकवाड यांनी तर नगर जिल्ह्यातील हरेगांव साखर कारखान्याच्या मालकशाहीच्या गळ्यालाच हात घातला. माधवरावांच्या साथीला नाना, लक्ष्मण पालवे, सांगळे, बोराडे होतेच. या साऱ्या डाव्या समाजवाद्यांच्या गटाने हरेगांव कारखान्याला खंडाने जमिनी दिलेल्या खंडकरी शेतकऱ्यांच्या प्रयत्नाला वाचा पफोडली. कारखान्यांच्या मालकांनी खंडाने जमिनी शेतकऱ्यांकडून घेतल्या. मात्र कारखानदारांनी ३० ते ४० वर्षे होउनही खंडात १ पैशाची वाढ करायला तयार नव्हते.

शेतकऱ्यांच्या, त्यांच्या नेत्यांच्या कुठल्याच अर्जांना, विनंत्यांना ते काडीचीही किंमत देत नव्हते. तेव्हा त्या शेत्कऱ्यांना संघटित करुन एकतर खंडात भरघोस वाढ द्या नाही तर आमच्या जमिनी आम्हाला परत करा. या घोषणेवर माधवरांनी आणि लक्ष्मण पालवे, नाना मालुसरे, विश्वनाथ सांगळे या डाव्या समाजवादी गटाच्या कार्यकर्त्यांनी जमिनी ताब्यात घेण्याचा लढा सुरु केला. मात्र पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना ताबडतोब अटक केली. श्रीरामपूरच्या न्यायदान दलालांनी त्यांना २१ दिवस लॉकअप मध्ये ठेवण्याचा हक्कच पोलिसांना दिला. माजी केंद्रीय अन्नमंत्री रावसाहेब शिंदे यांचे बंधू ॲड. अण्णसाहेब शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उजवा हात असलेले दादासाहेब गायकवाड यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांनी त्यांची सुटका झाली.

किसान सभा प्रत्येक कम्युनिस्ट पक्ष सभासदाने पक्षाच्या सहमतीने ठरवलेले कोणत्या ना कोणत्या संघटनेचे कार्य केलेच पाहिजे. नानांनी त्यासाठी किसान सभा ही आघडी निवडली आणि जिंदगीत्तर व जीवनाच्या अखेरपर्यंत नाना त्याच आघाडीवर एकाग्रतेने काम करीत राहिले.

सन १९५२ च्या नाशिक जिल्ह्यासतील देशी भागात हा भीषण दुष्काळ पडला. हा खडतर दुष्काळ ५२ ते ५४ ही तीन वर्षे टिकला. परंतु अखेरपर्यंत सरकारने दुष्काळ जाहीर केलाच नाही. दुष्काळ जाहीर व्हावा म्हणून किसानसभेच्या माध्यमातून नानांनी आंदोलन छेडले. कळवण तालुक्यात मोठे पाळे येथे जिल्ह्यातील सर्व कार्यकत्यांची बैठक झाली. यावेळी नाना किसान सभेचे सेक्रेटरी होते. नानांनी व इतर कार्यकत्यांनी आठशे पन्नास गावांना भेटी देउन जागृती घडवून आणली. शेतकऱ्यांना जगण्यासाठी दुष्काळी कामे द्या, पिण्याच्या पाण्याची सोय करा, गुरांना वैरण, चारा, पाणी पुरवा या मागण्या नानांनी व सहकाऱ्यांनी केल्या होत्या.

तेथे लघु पाटबंधाऱ्याचे काम त्वरित सुरु करा अशी मागणी घेउन कॉ. डावखर व नानांनी मामलेदार

कचेरीवर प्रचंड मोर्चा नेला. परिणामी केद्राई धरणाचे काम सुरु झाले. जवळजवळ ४००० स्त्री पुरुष मजुरांना रोजगार मिळाला हे करीत असताना नानांचे तंत्र वेगळेच होते. कोणतीही मागणी कोणताही लढा याचा पाठपुरावा करताना प्रथम सामोपचाराचा पवित्राा आणि त्याने नाही जमले तर जन आंदोलन उभारायचे हा जनाधार नानांनी काकासाहेब वाघांचा हात धरुन ९०० गावांना बहुतांशी पायीच फिरुन जमविला. नाना कष्टकरी, शेतकरी, कामगार वर्गाच्या पाठिशी दीपस्तंभासारखे उभे राहत म्हणूनच नाशिक, महाराष्ट्र व देशपातळीवर सर्व जनसामान्यांनी कॉ. नरेंद्र उर्फ नानासाहेब मालुसरे यांचा गौरव समारंभाचे आयोजन केले होते. हा समारंभ जवळजवळ चार तास चालला होता.

नाशिकचे हेमंत टकले यांनी वाचन केलेल्या नागरिकांच्या मानपत्राचे शब्द अजुनही घुमत होते. आजच्या सत्तेच्या राजकारणातील नियमांना अपवाद देउन त्यागाच्या राजकारणाचे जिवंत ज्वलंत उदाहरण तुम्ही घडविले नाना ! पददलित आदिवासींना आणि सर्वच श्रमजीवी मानवाला न्यायाच्या आणि समतेच्या सिध्द करणाऱ्या तुमच्या खडतर कार्याला आम जनतेच्या वतीने आमची मानवंदना ! गोरगरीब, कामगार, कष्टकरी व शेतकऱ्यांचा आधार दि. ३१/०३/२००० रोजी अस्तास गेला.

### निष्कर्ष

१. कॉम्रेड नाना मालुसरे (अनासक्त कर्मयोगी) यांनी जो लढा दिला तो मानवमुक्तीचा होता. तो कोणत्याही जाती, धर्म किंवा पंथाचा नव्हता.
२. भांडवलदारांच्या कचाट्यातून समाजाला बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले.
३. कामगार, कष्टकरी, शेतकऱ्यांना त्यांचा हक्क द्यावयाचा हा त्यांचा उद्देश होता.
४. हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्य चळवळींपासून ते जनसामान्यांना न्याय देण्याच्या लढ्यापर्यंत नानांनी कार्य केले.
५. नाशिक, महाराष्ट्र व संपूर्ण देशभर समाजाच्या असणाऱ्या प्रश्नांना वाट मोकळी करुन देण्यात नाना यशस्वी झाले.
६. कष्टकरी, कामगार वर्ग व शेतकरी वर्ग यांच्यात नवीन उर्जा नानांनी निर्माण केली.
७. ८०० ते ९०० गावांना भेटी देउन आदिवासींच्या हक्कंची जाणीव करुन दिली.
८. टादिवासींचा, कामगारांचा वैचारिक कणा मजबूत व कणखर झाला तो केवळ नानांच्या कार्यामुळे.
९. गरीबांचा वाली नाना होते असे म्हटले जाते.

संदर्भ –

१. जेम्स कॅम्बल वेल (१९८३) – गॅझिटिअर ऑफ इंडिया, बॉम्बे प्रेसिडेन्सी, व्हॅल्युम:१६, नाशिक डिस्ट्रीक्ट.

२. गॅझिटिअर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट (१९७५) नाशिक जिल्हा, बॉम्बे प्रसिडेन्सी.

३. राजदरेकर सुहास (जुलै १९९९)? 'तीर्थक्षेत्रापासून ते उद्योगनगरीकडे नाशिक शहराची वाटचाल, नाशिक शहराचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय इतिहासाचा मागोवा' (१८६४– १९८०), पुणे विद्यापीठ, पुणे.

४. कमोद कैलास (एप्रिल २००७) – माझं नाशिक, राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे, द्वितीयावृत्ती.

५. छापरवाणे मि.रा. (१९८०), औद्योगिक घडण व धोरण, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे–३०, प्रथमावृत्ती.

६. डोळस अविनाश, लिंबाळे शरणकुमार (संपा.) – सामाजिक चळवळी अस्पृश्यता निवारण, दलित शेतकरी व कामगार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती.

७. खोपकर कृष्णा (प्र.संपा.) (मार्च २००५) कॉम्रेड नाना मालुसरे 'अनासक्त कर्मयोगी', कॉम्रेड नाना मालुसरे चॅरिटेबल संस्था, पटेल कॉलनी, शालिमार, नाशिक–१, प्रथमावृत्ती.

८. गयकवाड प्रदीप (संपादक) – (ऑक्टोबर २००५) – कामगार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडक भाषणे व लेख, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर–१७, द्वितीयावृत्ती.